महाराष्ट्र विधानसभा
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : शोक प्रस्ताव -

श्री.नामदेवराव बकाराम दोनाडकर, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).

चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(१) **सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार,** जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, कृषिभुषण साहेबराव पाटील, गोपाळा शेट्टी, योगेश सागर, बाळा नांदगावकर, अमीन पटेल, बाबा सिद्धीकी, संजय भेगडे, पंकज भुजबळ, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. रमेश थोरात, गणपत गायकवाड, दिलीप वाघ, संजय सावकारे, मंगेश सांगळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सात वर्षांत ३४६४ अपघात झाल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये उघडकीस येणे, यातील ६१२ अपघातांमध्ये ८४१ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागणे, द्रुतगती महामार्गावर वेगाने धावणाऱ्या वाहनांवर कारवाई करून अपघातांचे प्रमाण काही अंशी कमी झाले असले तरी बळींची संख्या मात्र अपघातांच्या दुप्पट वाढणे, सिनेकलावंत, बिझनेसमन, राजकारणी, शासकीय अधिकारी यांची या मार्गावर सतत ये-जा असणे, माहे डिसेंबर २०१२ मध्ये सिनेअभिनेते आनंद अभ्यंकर आणि अक्षय पेंडसे यांचा याच द्रुतगती महामार्गावर अपघातात मृत्यू होणे, तसेच अमेय राणे व भालचंद्र कदम यांचाही अपघात होऊन ते गंभीर जखमी होणे, या घटनाक्रमांचा विचार करता शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अपघातस्थळांच्या अहवालाबाबत अद्यापही कोणताच निर्णय शासनाकडून झालेला नसणे, उंचीचे रस्ता दुभाजक बांधणे, पोलिस चौक्या वाढविणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, गावांकडून येणाऱ्या चोरवाटा बंद करणे यापैकी कोणत्याही प्रकारची कामे अद्याप न होणे, त्यामुळे एक्सप्रेस वे वर लोक जीव मुठीत घेऊन प्रवास करीत असणे, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य

दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी तातडीने निर्णय घेऊन करावयाची योग्य ती कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया".

(२) **सर्वश्री. राम कदम,** एकनाथराव खडसे (पाटील), बाळा नांदगावकर, नितीन भोसले, मंगेश सांगळे, वसंत गिते, पंकज भुजबळ, प्रकाश भोईर, शिशिर शिंदे, मंगेश सांगळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सहकार क्षेत्रातील एक मोठी बँक म्हणून पुणे येथील रूपी सहकारी बँक ओळखली जात असून या बँकेवर रिझर्व्ह बँकेने "दि.२२ फेब्रुवारी, २०१३ रोजी आर्थिक निर्बंध लावण्याचा घेतलेला निर्णय, यापूर्वीही रिझर्व्ह बँकेने २००२ मध्ये आर्थिक अनियमिततेच्या कारणावरून संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर ५ प्रशासकांची नियुक्ती करणे, तरीही बँकेच्या संचालक मंडळाच्या मनमानी व अनागोंदी कारभारामुळे रिझर्व्ह बँकेला पुन्हा आर्थिक निर्बंध लावण्याची आलेली पाळी, परिणामतः लाखो ठेवीदार, खातेदारांच्या आर्थिक व्यवहारांना नाहक बसलेला फटका, त्यांची होत असलेली आर्थिक कोंडी, रिझर्व्ह बँकेने रूपी को.ऑप. बँकेवर निर्बंध घालण्यापूर्वी रूपी बँकेला आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत कळविलेले असतानाही बँकेच्या संचालक मंडळांनी त्याची दखल न घेणे, सबब या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून बँकेतील ठेवीदार व खातेदार यांची आर्थिक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने विनाविलंब ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

(३) **सर्वश्री. चंद्रदीप नरके,** जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, किसन कथोरे, कृषिभूषण साहेबराव पाटील, सुभाष देसाई, महादेव बाबर, प्रकाश (बाळा) सावंत, विनोद घोसाळकर, आर,एम,वाणी, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री. विवेक पाटील, धैर्यशील पाटील, वि.स.स.पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील ४४ जिल्ह्यांमधील १२३ तालुक्यांचा समावेश इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये करण्यात आलेला असणे, त्यामध्ये विशेषतः कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी, भुदरगड, कागल, गडहिंग्लज, आजरा, चंदगड या तालुक्याचा पश्चिम घाट रांगेत समावेश होत असून कोल्हापूर जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्राच्या ३० टक्के अधिक क्षेत्र प्रतिबंधित, नाविकास, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने घोषित केले असणे, राष्ट्रीय स्तरावर ३० टक्के क्षेत्राचा विचार केला तर, राष्ट्रीय पर्यावरण वृध्दी आणि संगोपन योजनांमध्ये जिल्हयाचा मोठा सहभाग असून ग्रामस्वच्छता अभियान, बायोगॅस संकल्प, इकोफ्रेंडली व्हीलेज इत्यादी पर्यावरण पूरक योजनांची अंमलबजावणी

करण्यामध्ये येथील सर्व राजकीय, सामाजिक घटकांबरोबरच जनतेचे मोठे योगदान असणे, याशिवाय जिल्हयाच्या भौगोलिक क्षेत्राच्या ७५ टक्के क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले तर, जिल्हयाच्या संपूर्ण कृषी, रहिवाशी आणि उद्योग विकासावर विपरीत परिणाम होणार असणे, तसेच या तालुक्यातील धरणे व लघु पाटबंधारे प्रकल्पातील पाणी शेतीसाठी उपलब्ध करून देण्यास निर्बंध येणे, शासनाच्या इको-सेन्सिटीव्ह झोनमध्ये डॉ.गाडगीळ समितीने पश्चिम घाटाचे विविध भागांमध्ये वर्गीकरण केले असणे, त्यामध्ये अतिउच्चतम संवेदनशील क्षेत्र (ESZ-१), उच्चतम संवेदनशील क्षेत्र (ESZ-२), साधारण संवेदनशील क्षेत्र(ESZ-३), अशी वर्गवारी केली असणे, त्यामध्ये ESZ-१ या वर्गवारीत पन्हाळा, गगनबावडा, शाहूवाडी, राधानगरी, भुदरगड, ESZ-२ मध्ये कागल, ESZ-३ मध्ये गडहिंग्लज, आजरा, चंदगड या तालुक्यांचा समावेश असणे, इको सेन्सिटिव्ह झोन संदर्भात शासनाच्या डॉ. माधवराव गाडगीळ समितीने केलेल्या शिफारशीमध्ये शेतीचे रूपांतर बिगर शेतीत पूर्णत: बंद, मातीच्या वरील स्तरांचे संवर्धन म्हणून मुरूम काढणे बंद, विटा बनविणे बंद, जमिनीवर पेव्हींग करावयाचे नाही, निलगिरी सारख्या झाडांची लागवडीस निर्बंध तसेच स्थानिक प्रजाती सोडून इतर प्रदेशातील प्रजाती लागवडीस बंदी, रासायनिक किटकनाशके/तणनाशके, रासायनिक खतांचा वापर ठराविक कालावधीनंतर हद्दपार, खाणकाम फक्त ESZ-१ मध्ये २०१६ पर्यंत टप्प्याटप्प्याने बंदी, ESZ-२ व ESZ-३ मध्ये अटींखाली परवानगी, नवीन वाळू उत्खनन व दगड खाण उद्योगासाठी ESZ-१ मध्ये बंदी, ३०-५० वर्षे जुने धरण व औष्णिक प्रकल्प टप्प्याटप्प्याने बंद, नवीन औष्णिक ऊर्जा किंवा पवनऊर्जा प्रकल्पांना मनाई तसेच जलविद्युत प्रकल्प १० मेगावॅटचे खाली मान्यता ते सुध्दा जाचक अटींखाली, नवीन महामार्ग, द्रुतगती मार्ग वाहतूक यांना परवानगी नाही, रेल्वे मार्ग, मोठे रस्ते यांना जाचक अटी लागू असणे, या सर्व अटींमुळे समाज व्यवस्था कोलमडून पडणार असून जनतेचा विकास व योग्य राहणीमानाचा मूलभूत हक्क काढून घेण्यासारखे होणार असणे, त्यामुळे मागासलेपणा आणि बेकारी वाढविणाऱ्या तसेच काही पर्यावरणवादी संघटनांच्या अट्टाहासापोटी नॅशनल ग्रीन ट्रॅब्युनल, दिल्ली यांचे माध्यमातून घटनात्मक चौकट सोडून जबरदस्तीने लादले जात असणे, इको सेन्सीटिव्ह झोनकरीता दुर्गम भागातील तालुक्यांची निवड केल्याने जनजीवनावर त्याचा विपरीत परिणाम होणे, तसेच पश्चिम घाटाच्या सर्वंकष विकासासाठी अभ्यास करण्यास केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या डॉ.कस्तुरीरंगन समितीने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी सिंधुदूर्ग जिल्ह्याला भेट देऊन पश्चिम घाटाच्या संवर्धनाविषयी डॉ.माधवराव गाडगीळ अहवालाच्या शिफारशींच्या पुनर्विलोकनासाठी पश्चिम घाटाच्या सिंधुदूर्गातील भागाच्या संवर्धनासाठी राज्य शासन करीत असलेल्या उपाययोजनांचे अवलोकन करण्यासाठी डॉ.कस्तुरीरंगन

यांनी सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात बैठक घेऊन डॉ.माधवराव गाडगीळ समिती अहवालासंदर्भात जनतेने मांडलेल्या सूचनांचा समिती गांभीर्याने विचार करीत आहे व जिल्ह्याचा पर्यावरणपूरक विकास करण्यावर पश्चिम घाट संवर्धन समिती आग्रही राहील व सिंधुदूर्गवासीयांच्या भावना व विरोध केंद्रापर्यंत पोचविला जाईल असे डॉ.कस्तुरीरंगन यांनी बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने शासनाची विशेषत: कोल्हापूर-रत्नागिरी-सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या विकासाबाबत भूमिका स्पष्ट होण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर)

सहा : सर्वश्री. एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, गणपतराव देशमुख, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, संभाजी पवार, नाना पटोले, श्रीमती. मिनाक्षी पाटील, सर्वश्री. आर. एम. वाणी, गिरीष महाजन, सुधाकर भालेराव, प्रा. राम शिंदे, सर्वश्री. प्रकाश शेंडगे, सुधीर मुनगंटीवार, अबु आजमी, बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, वसंत गिते, शिशिर शिंदे, प्रविण दरेकर, रमेश पाटील, प्रकाश भोईर, मंगेश सांगळे, उत्तमराव ढिकले, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :

"राज्यात अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे संपूर्ण राज्यात दुष्काळ जाहीर करुन त्याप्रमाणे आवश्यक त्या उपाययोजना न करता शासनाने राज्यातील फक्त ७०६४ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करणे, दुष्काळाचे सावट गडद झाले असताना रब्बीची पीकेही नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, राज्यात दुष्काळाची भयानक स्थिती निर्माण होऊन गत वर्षाच्या तुलनेत दि.८ मार्च २०१३ पर्यंत राज्यातील धरणांमध्ये फक्त ३७ टक्के इतका अत्यल्प तर मराठवाड्यात केवळ ९ टक्केच पाणी साठा उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागासमवेत शहरी भागातही पाण्याची भीषण टंचाई निर्माण होणे, शासनाने पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक तेवढा टँकरद्वारे पाणी पुरवठा न करणे, दुष्काळग्रस्त भागात जनावरांसाठी पुरेश्या चाऱ्याच्या छावण्या न उभारणे, जुन्या आणेवारी पद्धतीमुळे दुष्काळी परिस्थितीत पिकांच्या झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना पुरेशी नुकसान भरपाई न मिळणे, शासनाने पाण्याच्या टंचाईमुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना व आर्थिक तरतुद न करता केंद्र शासनाकडे सादर केलेल्या रु.२२०० कोटी आर्थिक मदतीच्या प्रस्तावातील त्रुटींमुळे केंद्र शासनाकडून योग्य तो भरीव निधी न मिळता केवळ ७७८ कोटीच रक्कम प्राप्त होणे, दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाकडे विभागीय आयुक्तांनी मराठवाड्याला १२०० कोटी रुपये देण्याची केलेली मागणी, दुष्काळाच्या करावयाच्या उपाययोजना व निधीवरुन मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंत्र्यांमध्ये रोहयोचा निधी उपलब्ध न होणे, वीज बिलाची थकबाकी, धरणातून पिण्यासाठी, शेतीसाठी व उद्योगांसाठी

पाणी देतांना होत असलेला पक्षपातीपणा इ. विषयांवर त्यांच्यामध्ये खंडाजंगी होणे, शासनाने रोहयोच्या मजुरीत केलेली किरकोळ वाढ, दुष्काळ व पाणी टंचाई याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यास शासनाला आलेले अपयश तसेच माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रात गारपीट व अवकाळी पावसामुळे केळी, द्राक्ष, आंबा, हरभरा, ज्वारी, गहु, संत्री या पिकांचे व बागायतीचे कोट्यावधी रुपयांचे झालेल्या नुकसानीबाबत शासनाने अद्यापि कोणतीही मदत जाहीर न करणे, कोकण विभागात वणव्याच्या आगीमुळे आंबा इत्यादी फळपीके भस्मसात होणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे मदतीची मागणी करुनही त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, राज्याच्या दुष्काळी भागात शेतकऱ्यांनी शासनाच्या मदतीअभावी आत्महत्या करणे, परिणामी जनतेमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे तसेच रखडलेल्या सिंचनाच्या योजना पूर्ण करणे इत्यादी उपाययोजना करण्याची आवश्यकता, भविष्यात पाणी टंचाईमुळे जनतेमध्ये पाण्यावरुन उद्रेक होऊन दंगली होण्याची पोलिसांनी शासनाकडे व्यक्त केलेली भीती, परिणामी राज्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणी टंचाई लक्षात घेता कमी होत चाललेला पाणी साठा व आगामी जूनपर्यंतच्या कालावधीमध्ये पाण्याअभावी सर्वच बाबतीत म्हणजेच मानवी जीवन, शेती, जनावरे, पशुखाद्य, अन्नधान्य इ. बाबतीत निर्माण होणाऱ्या भयानक परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने तातडीने संपूर्ण राज्यात दुष्काळ जाहीर करुन त्याच्या निकषाप्रमाणे योग्य त्या उपाययोजना करण्याची व अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे नुकसानग्रसत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची आवश्यकता."

सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(१) श्री.एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स.

"नागपूर शहरात चोरी खून दरोडा, घरफोडी चैनस्नेचींग या सारख्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याबाबत" या विषयावरील श्री. देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स यांच्या दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४९६ मधील प्रश्न क्रमांक ७०७०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

"महावीज निर्मिती कंपनीस निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरविण्यात येत असल्याबाबत" या विषयावरील श्री.चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स यांच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४५० मधील प्रश्न क्रमांक ८१४७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ११ मार्च, २०१३.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.